# नेत्र- श्वसनाचे विकार, रक्तक्षय, सिकलसेलचाही विळखा

## पोल्ट्री कामगारांना विविध आजारांचा जाच

चारूशीला कुलकर्णी

**कोंबडी खत** म्हणून पक्ष्यांची विष्ठा संचय केल्यामुळे त्यातून अमोनिया व मिथेन वायू बाहेर पडतो. उग्र वासामुळे डोळे जळजळणे, डोळ्यातून पाणी येणे श्वसनाचे विकार असे तत्सम आजार पोल्ट्री फार्मच्या सान्निध्यात राहणारे कामगार व नागरिकांना जडू शकतात. या शिवाय, पोल्ट्रीतील कामगारांमध्ये रक्तक्षय, हिमोग्लोबिनची कमतरता, आतड्यांना सूज, किडनी स्टोन, सिकलसेल असे आजारही आढळत असल्याचे स्थानिक डॉक्टरांचे म्हणणे आहे. कुक्कुटपालनात अग्रेसर असणाऱ्या नंदुरबार जिल्ह्यात बर्ड फ्लूच्या संकटानंतर पक्ष्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जात असली तरी कामगारांच्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याने दिसून येते. या परिस्थितीला व्यावसायिकांची अनास्था जशी मारक ठरली, तशीच सरकारी आस्थापनांच्या उदासीनतेमुळे हे प्रश्न जटिल होण्यास हातभार लागत आहे.

आदिवासीबहुल नंदुरबार जिल्ह्यात २७ हून अधिक पोल्ट्री फार्ममध्ये लाखो पक्ष्यांचे संगोपन केले जाते. या पक्ष्यांना विविध कारणांस्तव अनेक आजार जडण्याची शक्यता असते. त्यात बर्ड फ्लूसह राणीखेत, फाऊल पॉक्स, गमबोरो, मरेक्स आदींचा समावेश आहे. पक्ष्यांना या आजारांना तोंड द्यावे लागू नये यासाठी व्यावसायिक विशेष दक्षता घेत आहे. सरकारी विभागाकडून परसबागेतील कुक्कुटपालनासाठी आठवडा तसेच महिन्याला लसीकरण केले जाते. त्यात एक दिवसाच्या पिलास विशेष लसीकरणासह सातव्या दिवशी, १४ व्या दिवशी बुस्टर, २१व्या दिवशी राणीखेत अशा विविध आजारांसाठी प्रतिबंधात्मक लसीकरण केले जाते. या प्रक्रियेत काही वेळा प्रतिजैवकांचाही (अँटीबायोटीक्स) वापर होत आहे. तापमानातील बदलाचा सामना नवजात पिलांपासून ७१ आठवड्यांच्या कोंबड्यांना करता यावा, यासाठी पोल्ट्रीच्या शेड्सला विशिष्ट आवरण करण्यात येते. थंडीच्या दिवसात पक्ष्यांना उबदार वातावरण देण्यासाठी ४० अंशापेक्षा अधिक उष्णता राहण्यासाठी दिव्यांचा वापर तर उन्हाळ्यात उष्णतेची तीव्रता कमी करण्यासाठी नैसर्गिक पद्धतीने पंख्याची सोय करण्यात आली आहे. एवढे करूनही एखादा पक्षी दगावल्यास त्याला पोल्ट्री फार्मच्या आवारातच खोदलेल्या खड्ड्यात मीठ, बीसीजी पावडर यासह अन्य रासायनिक पदार्थांचा वापर करत पुरले जाते. पक्ष्यांच्या संगोपनात दक्षता बाळगणारे व्यावसायिक कामगार आरोग्याच्या बाबतीत कमालीचे उदासीन असल्याचे दिसून येते.

नंदुरबार जिल्ह्यात प्रामुख्याने 'कॅलिफोर्निया' पद्धतीने अर्थात मांडणी पद्धतीने (रँक) कोंबड्यांचे संगोपन केले जाते. त्यांना त्याच ठिकाणी स्वयंचलित अथवा कामगारांच्या साहाय्याने खाद्य आणि पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. कोंबड्यांना देण्यात येणारा खुराक हा सर्वसमावेशक आहार असतो. त्यामुळे पक्ष्यांची निर्माण होणाऱ्या विष्ठेपासून फार्म परिसरात दुर्गंधी पसरते. यामुळे कामगारांना आरोग्य समस्या भेडसावू शकतात, याकडे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. माधव सादगीरे यांनी लक्ष वेधले. सातत्याने पडणाऱ्या पक्ष्यांच्या विष्ठेचा संचय केला जातो. वर्षातून दोन वेळा त्याची साफसफाई केली जाते. विष्ठेच्या संचयाला खाली-वर न केल्यास त्यातून अमोनिया वायू बाहेर पडतो. त्यामुळे डोळे जळजळणे, डोळ्याला खाज येणे आदी नेत्रविषयक समस्या उद्‌भवू शकतात. याशिवाय त्यातून मिथेनही बाहेर पडल्याने श्वसनाचे विकार जडू शकतात. दोन वर्षांपूर्वी नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात पोल्ट्री फार्म असणाऱ्या जवळपास दहा किलोमीटरच्या परीघातील जवळपास १०० हून अधिक ग्रामस्थ आणि कामगारांना डोळ्यांना खाज येणे, डोळ्यातून पाणी येणे आदी त्रास झाल्याचे नेत्रचिकित्सक मधुकर गावित यांनी सांगितले. उपजिल्हा रुग्णालय अधिकारी डॉ. अविनाश मावची यांनी अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांचे प्रमाण अधिक असल्याचे नमूद केले. यात दम्याच्या विकाराची लागण झालेल्यांचा क्रमांक वरचा लागतो. तसेच रक्तक्षय, सिकलसेल असे आजाराचे रुग्णही आढळतात. कोंबड्यांची विष्ठा साफसफाई करताना सोयीसुविधा दिल्या जात नसल्याने काहींना त्वचाविकारही जडू शकतात, असे वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

(सीएसई मीडिया फेलोशिप अंतर्गत केलेला अभ्यास)

### कामगारांच्या आरोग्यपत्रिकेची गरज



बर्ड फ्लूच्या वेळी निर्माण झालेली परिस्थिती पाहून स्थानिकांमध्ये काहीशी अस्वस्थता निर्माण झाली. कारण, बर्ड फ्लूचे जंतू अन्नाद्वारे मानवी शरीरात येऊ शकतात. सुदैवाने आपल्याकडे या आजारात एकही मानवी बळी गेला नाही. आपल्या खाद्य संस्कृतीत कोणतेही अन्न आधी शिजविले जाते आणि नंतर ते खाल्ले जाते. शिजवण्यासाठी ४५ अंशापेक्षा अधिक उष्णतेचा वापर होतो. त्या तापमानात कोणतेही जंतू राहत नाहीत. ही परिस्थिती आपल्याला हाताळता आली असली तरी अजूनही कोंबडीची विष्ठा, पिसे, दुर्गंधी, त्यातून जंतुसंसर्ग होऊन निर्माण होणारे आजार आणि त्यांचा पोल्ट्री फार्ममध्ये काम करणाऱ्या कामगारांवर होणारा परिणाम अभ्यासता आलेला नाही. शासनाने पोल्ट्री फार्ममधील कामगारांना आरोग्यपत्रिका देऊन त्यांचा विमा काढून वेळोवेळी तपासणी करणे गरजेचे आहे.

- डॉ. विजू वसावे (तत्कालीन सहाय्यक पशुधन विकास अधिकारी)

### हिमोग्लोबिनची कमतरता



आसिफा धर्मार्थ दवाखान्यात प्रामुख्याने गरीब कुटुंबातील रुग्ण उपचार घेण्यासाठी येतात. त्यातील काही पोल्ट्री व्यवसायातील कामगार असून त्यांना किडनी स्टोन, सिकलसेल, हिमोग्लोबिनची कमतरता, आतड्यांना सूज यासह श्वसनाचे विकार आदींचा त्रास होतो.

- डॉ. महेमुद फैजी (आसिफा धर्मार्थ दवाखाना)

